आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३० ऑगस्ट २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जपानचा दौरा आटोपून प्रधानमंत्री चीनकरता रवाना/ भारत - जपान वार्षिक शिखर परिषदेदरम्यान सुरू उपक्रमांमुळे दोन्ही देशातल्या भागीदारीला चालना मिळेल, असा व्यक्त केला विश्वास

- रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन येत्या डिसेंबरमधे भारताच्या दौऱ्यावर येणार

- अमेरिकेतल्या फेडरल न्यायालयाने ट्रम्प यांनी आकारलेली टॅरिफ ठरवली बेकायदेशीर

- जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीचा उपांत्य फेरीत प्रवेश

- बेंगळुरू इथे आरसीबीच्या मिरवणुकीत चेंगराचेंगरीमुळे मरण पावलेल्यांच्या कुटुंबाना प्रत्येकी २५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर

**आणि**

- महाराष्ट्रातल्या बीड जिल्ह्यात पेंडगाव इथं रस्ता अपघातात सहा जणांचा मृत्यू

**<><><><>**

१५ व्या भारत - जपान वार्षिक शिखर परिषदेदरम्यान सुरू केलेल्या भागीदारी उपक्रमामुळे दोन्ही देशातल्या व्यापार, तंत्रज्ञान, पर्यटन, कौशल्य, सुरक्षा आणि सांस्कृतिक भागीदारीला चालना मिळेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते टोकयोमधे आयोजित प्रशासकीय प्रमुखांच्या परिषदेला संबोधित करत होते. दोन्ही देशांमधे चालत आलेल्या पूर्वापार संबंधांमधून आजच्या संबंधाना ऊर्जा मिळते, असं प्रधानमंत्री म्हणाले. भारत आणि जपान यांच्यातले संबंध अधिक व्यापक करत भारतीय राज्यं आणि जपानमधल्या प्रांतांचे संबंध बळकट करणं आवश्यक आहे, भारतातल्या राज्य सरकारांनी आणि जपानमधल्या गव्हर्नररनी तंत्रज्ञान, नवोन्मेष, पायाभूत सुविधा, स्टार्टअप्स आदी क्षेत्रात भागीदारी वाढवावी असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

दरम्यान, प्रधानमंत्री मोदी जपानचे प्रधानमंत्री शिगेरू इशिबा यांच्यासह बुलेट ट्रेननं प्रवास करत सेंदई इथं पोहोचले. तिथे दोन्ही नेत्यांनी इलेक्ट्रॉन कारखान्याला भेट दिली. यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीसाठी चीनला रवाना झाले. चीनमधे तीएनजिन इथं होणाऱ्या बैठकीत ते सहभागी होतील.

<><><><>

शांघाय सहकार्य संघटनेची २५ वी शिखर परिषद उद्यापासून चीनमधे तिएनजीन इथं सुरू होत आहे. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सहभागी होतील आणि जागतिक नेत्यांशी चर्चा करतील. या परिषदेत शांघाय सहकार्य संघटनेच्या मागच्या २५ वर्षांच्या कामकाजाचा आढावा घेतला जाईल तसंच पुढल्या दहा वर्षांसाठी धोरण आखलं जाईल. या परिषदेचं यजमानपद चीन पाचव्यांदा भूषवत असून चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग परिषदेच्या अध्यक्षपदी असतील. या परिषदेला वीसहून अधिक देशांचे राष्ट्रप्रमुख तसंच दहा आंतरराष्ट्रीय संघटनांचे नेते उपस्थित राहणार आहेत.

<><><><>

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन येत्या डिसेंबरमधे भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत. रशियाचे परराष्ट्र व्यवहारमंत्री युरी उशकोव्ह यांनी मॉस्को इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पुतीन चीनमधे शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीकरता जाणार असून तिथं ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबरोबर या दौऱ्याच्या तयारीकरता चर्चा करतील. रशियाकडून इंधन तेल खरेदी केल्याबद्दल अमेरिकेने भारतावर वाढीव व्यापार निर्बंध लादल्याच्या पार्श्वभूमीवर पुतीन यांचा हा दौरा होणार आहे.

<><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेली विविध प्रकारची आयात शुल्कं बेकायदेशीर असल्याचं सांगत फेडरल न्यायालयाने रद्दबातल ठरवली आहेत. आंतरराष्ट्रीय आपत्कालीन अधिकार कायदा या करांना मान्यता देत नाही, असं न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. फेडरल न्यायालयाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी ट्रम्प

प्रशासनाला १४ ऑक्टोबरपर्यंत वेळ दिली असून तोपर्यंत ही शुल्क लागू राहतील, अशी माहिती व्हाईट हाऊसचे प्रवक्ते कुश देसाई यांनी दिली.

**<><><><>**

देशातल्या पहिल्या टेंपर्ड काचेच्या कारखान्याचं उद्घाटन आज उत्तर प्रदेशात नॉएडा इथं केंद्रीय मंत्री अश्विनि वैष्णव यांच्या हस्ते झालं. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनांमधे भारताने लक्षणीय प्रगती केली आहे असं वैष्णव यावेळी म्हणाले. इलेक्ट्रॉनिक वस्तूंचं उत्पादन सहा पटींनी वाढलं असून मोबाईल फोन्स, लॅपटॉप आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे सुटे भागही मेक इन इंडिया उपक्रमात तयार होत आहेत असं ते म्हणाले.

**<><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज मुंबईच्या दौऱ्यावर असून काल ते मुंबईत दाखल झाले. मुंबईत दाखल झाल्यानंतर सर्वप्रथम त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या निवासस्थानी गणेशाचं दर्शन घेतलं. त्यानंतर त्यांनी सह्याद्री अतिथीगृहात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर व्यापक चर्चा केली. त्यानंतर शहा यांनी लालबाग इथे गणेशाचं दर्शन घेतलं.

**<><><><>**

मराठा आरक्षणासंदर्भात काम करणाऱ्या समितीचे अध्यक्ष न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्यासह दोन वरिष्ठ अधिकारी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन चर्चा करतील, अशी माहिती मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज दिली. या उपसमितीच्या बैठकीनंतर आज ते वार्ताहरांशी बोलत होते. या बैठकीत सर्व मुद्द्यांवर सविस्तर, सकारात्मक चर्चा झाल्याचं ते म्हणाले. हा प्रश्न सुटावा, हीच सरकारची भूमिका असल्याचं त्यांनी नमूद केलं. आंदोलनासाठी मुंबईत आलेल्या मराठा बांधवांच्या सोयीसाठी पाणी, दिवे, स्वच्छतेची सोय करण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

पॅरिस इथे सुरू असलेल्या बीडब्ल्युएफ जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी उपांत्य फेरी गाठली आहे. त्यांनी काल रात्री झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत मलेशियाच्या आरोन चिया आणि वुई यिक सोह या जोडीचा २१-१२, २१-१९ असा पराभव केला. या विजयामुळे भारताचं कास्य पदक निश्चित झालं आहे. उपांत्य फेरीत या जोडीचा सामना चीनच्या ली यू आणि बो यांग चेन यांच्याशी होणार आहे.

<><><>

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या दुहेरीत अनिरुद्ध चंद्रशेखर आणि विजय प्रशांत या भारतीय जोडीने दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. क्रिस्तियन हॅरिसन आणि इव्हान किंग या अमेरिकन जोडीचा त्यांनी ३-६, ६-३, आणि ६-४ असा तीन सेट्स मधे पराभव केला. ऑस्ट्रेलियाचा जॉन पॅट्रिक स्मिथ आणि ब्राझिलचा फर्नांडो रोंबोली या जोडीबरोबर आज त्यांचा सामना होईल.

<><><>

येत्या शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या महिलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेसाठी भारताचा संघ आज चीनमध्ये हांगझोऊ इथे रवाना झाला. सलीमा टेटे ही या संघाची कर्णधार आहे. पुढच्या वर्षी होणाऱ्या महिलांच्या हॉकी विश्वचषक स्पर्धेत भारताचं स्थान निश्चित करण्यासाठी ही स्पर्धा जिंकणं महत्त्वाचं आहे. भारतीय महिला संघाने यापूर्वी २००४ आणि २०१७ मध्ये आशिया चषक जिंकला होता.

<><><>

बेंगळुरू इथे आरसीबीच्या विजयी मिरवणुकीत चेंगराचेंगरीमुळे मरण पावलेल्यांच्या कुटुंबाना प्रत्येकी २५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. आरसीबी संघाने आपल्या समाज माध्यमावर या मदतीची घोषणा केली आहे. आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आरसीबी संघाने १८ वर्षांनंतर मिळवलेल्या विजयाच्या निमित्ताने ४ जून रोजी चिन्नास्वामी

मैदानाबाहेर ही मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीत चेंगराचेंगरी झाल्याने ११ जणांचा मृत्यू झाला होता आणि अनेक जण जखमी झाले होते.

**<><><><>**

महाराष्ट्रातल्या बीड जिल्ह्यात धुळे-सोलापूर महामार्गावर पेंडगाव इथं आज सकाळी झालेल्या रस्ते अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. मृत व्यक्ती पेंडगावला दर्शनासाठी जात असताना भरधाव कंटेनरने त्यांना धडक दिल्यानं हा अपघात झाला. या घटनेची सखोल चौकशी करण्याचे निर्देश पोलिसांना दिल्याचं उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी वार्ताहरांना सांगितलं. तसंच मृतांच्या कुटुंबांना आवश्यक मदत दिली जाईल असं आश्वासनही पवार यांनी दिलं.

**<><><><>**

जम्मू आणि काश्मीरमध्ये रियासी जिल्ह्यातल्या दुर्गम भागात आज पहाटे मुसळधार पावसामुळे दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत एकाच कुटुंबातल्या सात जणांचा मृत्यू झाला. पोलीस, एसडीआरएफ आणि स्थानिक प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांसह बचाव पथकांनी सर्व मृतदेह बाहेर काढले आहेत. डोंगराळ भागात तसंच दरड प्रवण क्षेत्रातल्या रहिवाशांना सतर्क राहण्याचं आवाहन जिल्हा प्रशासनाने केलं आहे. दरम्यान, जम्मू काश्मीरमध्ये रामबन जिल्ह्यात ढगफुटीमुळे झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या चार झाली असून एक जण बेपत्ता आहे. घटनास्थळावर बचाव आणि मदत कार्य सुरू आहे. हिमाचल प्रदेशात संततधार पाऊस, ढगफुटी आणि दरड कोसळल्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. राज्यातले तीन राष्ट्रीय महामार्ग तसंच ५५७ रस्ते बंद झाल्याची माहिती राज्य आपत्कालीन विभागाने दिली आहे. संपूर्ण राज्यात वीजपुरवठा आणि पिण्याच्या पाण्याचा पुरवठा खंडित झाला आहे. हिमाचल प्रदेशात मंडी, शिमला, चंबा, कांगडा, सिरमौर, कुल्लू आणि हमीरपूर या जिल्ह्यांना याचा सर्वाधिक फटका बसला आहे. गेल्या तीन महिन्यात झालेल्या राज्यात पावसामुळे घडलेल्या विविध दुर्घटनांमध्ये आतापर्यंत ३१७ जण मृत्युमुखी पडले असून ३७४ जण जखमी झाले आहेत. पुरात ४० जण बेपत्ता झाले आहेत.

**//<><><><>//**